**शहीद वारस अर्थसहाय्य सुवर्ण महोत्सवी वर्ष योजनेअंतर्गत स्वातंत्र्योत्तर काळात दि.१५/८/१९४७ ते ३०/४/१९९५ या कालावधीत झालेल्या युद्धात/मोहिमेत शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांना देण्यात येणारे अर्थसहाय्य १०० टक्के शासकीय निधीतून देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२२/प्र.क्र. २१४/ मासैक**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ७ जुलै, २०२६

वाचा:-१) शासन निर्णय,सा.प्र.वि., क्र.मासैम-२००५/१०३७/(प्र.क्र.२२८/२००५)/२८, दि. ०७/८/२००९.
२) शासन निर्णय,सा.प्र.वि.,क्रमांक:मासैम-२०१६/प्र.क्र.९२(३)/२०१६/२८, दि.३०/११/२०१६.

प्रस्तावना:-

०१. दि.१५/८/१९४७ ते ३०/४/१९९५ या कालावधीत झालेल्या युद्धात/मोहिमेत शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांना दरमहा अर्थ सहाय्य करण्यासाठी शहीद वारस अर्थसहाय्य सुवर्ण महोत्सवी वर्ष योजना संदर्भीय क्र. १ येथील शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे. तसेच संदर्भीय क्र.२ येथील शासन निर्णयान्वये रु.३०००/- इतकी रक्कम दरमहा शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांना देण्यात येत असून सदर आर्थिक सहाय्यासाठी होणार खर्च राष्ट्रीयकृत बँकेत गुंतविण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहायता(कारगील) निधीच्या मुदत ठेवीच्या रकमेवरील व्याजातून व कमी पडणारी रक्कम सैनिक कल्याण विभागाच्या कल्याणकारी निधीतून देण्यात येते.

०२. मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीमध्ये येणारी रक्कम ही केवळ राष्ट्रीयकृत बँकामध्ये गुंतविलेल्या मुदत ठेवींच्या व्याजातून येत होती व व्याजाव्यतिरीक्त या निधीमध्ये इतर कोणतेही मिळकतीचे पर्याय उपलब्ध नाहीत. शहीद वारस अर्थसहाय्य सुवर्ण महोत्सवी वर्ष योजने व्यतिरीक्त युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये, तसेच देशातील संबंधी मोहिमेत, चकमकीत / देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या आणि अपंगत्व आलेल्या जवानांना तसेच महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना देय आर्थिक मदतीच्या ५० टक्के रक्कम मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीमूधन देण्यात येते. सदर आर्थिक मदतीमध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे. त्यामुळे व्याजाची रक्कम ही खर्चाच्या रकमेपेक्षा अपूरी पडत असल्यामुळे मुख्यमंत्री सहायता

(कारगील) निधीमधून मुदत ठेवीच्या मुदतपूर्तीनंतर पुन्हा ठेवी करता आल्या नाहीत व मिळालेल्या ठेवींच्या मुद्दलाची रक्कम खर्च करण्यात आल्यामुळे सद्यस्थितीत मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीमधील रक्कम संपुष्टात आली आहे. यास्तव शहीद वारस अर्थसहाय्य सुवर्ण महोत्सवी वर्ष योजनेनुसार स्वातंत्र्योत्तर काळात दि.१५/८/१९४७ ते ३०/४/१९९५ या कालावधीत झालेल्या युद्धात/मोहिमेत शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांना दरमहा देण्यात येणारे अर्थसहाय्य १०० टक्के शासकीय निधीतून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

०१. शहीद वारस अर्थसहाय्य सुवर्ण महोत्सवी वर्ष योजनेनुसार स्वातंत्र्योत्तर काळात दि.१५/८/१९४७ ते ३०/४/१९९५ या कालावधीत झालेल्या युद्धात/मोहिमेत शहीद झालेल्या सैनिकांच्या वारसांना दरमहा देण्यात येणारे रु.३०००/- इतके अर्थसहाय्य १०० टक्के शासकीय निधीतून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

०२. या योजनेअंतर्गत येणारा खर्च भागविण्याकरीता लेखाशीर्ष निर्धारीत करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४२८१/व्यय-४, दिनांक २५/६/२०२६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७०७१२५४२३६५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

URMILA POPAT SAWANT

Digitally signed by URMILA POPAT SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=532e1c167ebaaff43f5811aa7e45b8f790eb47c4f4cdf5bad586d61ab9901df2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C586C9348CA72192AB033313815E031BC4374F8A3A8575A392F3FE875E8661EC, cn=URMILA POPAT SAWANT
Date: 2026.07.07 12:55:23 +05'30'

(उर्मिला सावंत)
**अवर सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.मंत्री (मा.सै.क.) यांचे खाजगी सचिव,
५.सर्व मा. विधान सभा सदस्य व विधान परिषद सदस्य
६. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक,
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

९. ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०. कमांडर, महाराष्ट्र-गुजरात एरिया मुख्यालय, कुलाबा, मुंबई.
११. मुख्य माहिती आयुक्त व सर्व माहिती आयुक्त
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४ .महालेखापाल (लेखा परीक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र, मुंबई,
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,
१८.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे-४११००६.
२०. सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,
२१.सर्व मंत्रालयीन विभाग
२२. सामान्य प्रशासन विभागाची सर्व कार्यासने,
२३. सह संचालक, लेखा व कोषागार, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
२४. वित्त विभाग/व्यय-४, अर्थ-१३, मंत्रालय, मुंबई-३२
२५. निवडनस्ती/मासैक (कार्या.२८ )